

अनुभव

मागे वळून पाहताना... आशा पारेख


सेन्सॉर बोर्डाच्या चेअरपर्सन पदावरून निवृत्त झालेल्या आशा पारेखने अभिनय, निर्मिती, दिग्दर्शन आणि वितरण अशा विविध क्षेत्रांत काम केलं. त्या त्या क्षेत्रातले त्यांचे अनुभव. बालपणातील गमतीजमती याबद्दल आज मागे वळून बघताना त्यांना काय वाटतंय?

□ रेखा खान

आशा पारेख यांनी सिनेसृष्टीमध्ये खूप काळ घालवला आहे. बालकलाकार म्हणून आपल्या कारकीर्दीचा श्रीगणेशा करणारी आशा १९५९मध्ये *दिल देके देखो* चित्रपटातून नायिका म्हणून प्रथम चमकली. या गोष्टीला आज ४० वर्षं झाली आहेत. परंतु या कालावधीत त्या ३० वर्षं नायिका म्हणून रसिकांच्या हृदयावर अधिराज्य करणाऱ्या आशाने त्यानंतर काही चित्रपटांमध्ये चरित्र भूमिकाही केल्या. त्यांनी वितरणामध्ये नशीब आजमावलं आणि काही काळापर्यंत त्या सिनेआर्टिस्ट असोसिएशनच्या प्रेसिडेंटही होत्या. हे सर्व काही असूनसुद्धा त्यांनी सेन्सॉर बोर्डाच्या चेअरपर्सन म्हणून तीन वर्षं काम केलं. त्यांचे यश हे एका सुंदर अशा वळणावर आलेलं आहे. त्यामुळे *ज्योती*पासून निर्माती झालेली आशा आज *कोरा कागज* आणि *कंगन* अशा सफल झालेल्या धारावाहिकांची निर्माती-दिग्दर्शिका आहे. दीपावलीनिमित्त या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अभिनेत्री-निर्मातीचे पहिले अनुभव...

पहिली शाळा: माझ्या पहिल्या शाळेशी माझ्या खूप काही आठवणी जोडलेल्या आहेत. त्या अशा की, माझ्या आई-वडिलांची मी एकुलती एक लाडकी मुलगी. मुंबईतल्या चांगल्यात चांगल्या आणि मोठ्या शाळेत प्रवेश घेतला पाहिजे. शेवटी त्यांच्या इच्छेप्रमाणेच माझ्यासाठी जे.पी.पेटेड हायस्कूलमध्ये प्रवेश मिळवला. त्यावेळेला आम्ही सांताक्रूझला राहात होतो आणि माझी शाळा तर शहरात होती, त्यामुळे एक मोठी समस्या निर्माण झाली. मी







लहान असल्यामुळे रोज एवढ्या लांब शाळेत कशी जाणार-येणार? तेव्हा त्यांनी मला आजी-आजोबांजवळ मुंबईत (शहरात) ठेवायचा निर्णय घेतला. त्यावेळी आई-वडिलांपासून दूर जाणार याचं मला खूप दुःख झालं, त्यामुळे मी रडून-रडून स्वतःची अवस्था फार वाईट करून घेतली होती. माझे आजी-आजोबाही माझ्यावर खूप-खूप प्रेम करायचे; परंतु माझ्या आई-बाबांची आठवण सारखी येतच राहायची. प्रत्येक शनिवार-रविवार मी माझ्या घरी जात होते, परंतु रविवारी रात्री पुन्हा आजी-आजोबांकडे जाण्याची वेळ झाली की पुन्हा रडावयास सुरुवात करायची. अशाप्रकारे रडून व गोंधळ घालून जेमतेम मी एक वर्ष कसं तरी काढलं आणि त्यानंतर मी आई-बाबांना सांगितलं की मला सांताक्रुज ते चर्चगेट बसने जाणं-येणं मान्य आहे, परंतु मी इथे राहाणार नाही. बसमुळे माझे खूप हाल व्हायचे. सकाळची शाळा असल्यामुळे पहाटे ५.००वाजता उठावं लागे आणि पुन्हा घरी परत येईपर्यंत दुपारचे दोन ते अडीच वाजायचे. त्यामुळे शाळेतून परत येताना बसमध्ये खूपच झोप यायची.

शाळेचा पहिला दिवसः पहिल्या दिवशी शाळेत खूपच मजा आली. कारण आमची पूर्ण शाळा मुलींची असल्यामुळे सगळीकडे मुलीच-मुली होत्या. त्यातच आमच्या सर्व टीचर्स यासुद्धा महिलाच होत्या. शाळाही खूप मोठी असल्यामुळे तेथे सर्व चांगल्या व श्रीमंत घराण्यातल्या मुली होत्या. तरीही त्या सर्वजणी एकमेकींशी मिळून-मिसळून एकोप्याने, मैत्रीपूर्ण भावनेने राहात होत्या आणि या सर्व गोष्टींमुळेच मला माझी शाळा खूपच आवडायची.

ट्रेनचा पहिला प्रवासः जेमतेम एक वर्ष बसचा प्रवास करत असतानाच मला कळले की माझ्या मैत्रिणी ट्रेनने जातात. तोपर्यंत मी थोडी मोठी झाली होती. त्यामुळे घरी हट्ट करू लागली की मीही ट्रेननेच शाळेला जाणार व येणार. मी खूपच गोंधळ घातल्यामुळे घरच्यांना मला ट्रेनने शाळेला पाठवणे मान्य करावेच लागले, आणि मी ट्रेनने शाळेला जाऊ-येऊ लागली, तेव्हाची मजा काही वेगळीच होती. तेव्हा आम्हाला बहुतेक ट्रेन रिकामीच मिळायची म्हणजे गर्दी जास्त नसायची. त्यामुळे आम्ही रिकाम्या बाकांवर बसून खूप दंगामस्ती करत असू. या गोष्टीवर टी.सी.चाही आम्हाला ओरडा मिळे. परंतु एवढं सगळं असूनही आम्ही दंगामस्ती करणं काही सोडत नव्हतो.



*गूँज उठी शहनाई*मध्ये तरुण आशा आणि राजेंद्रकुमार



सुरुवातीच्या दिवसात लाभलेली शम्मीची मोलाची साथः *तुमसा नही देखा*मध्ये

स्टेजवर पहिला कार्यक्रमः ही त्यावेळची गोष्ट आहे जेव्हा प्रेमनाथजी आमच्या शेजारी राहात होते. त्यावेळेला मी फार चांगला म्हणावा असा थोडाफार नाच करत होते. प्रेमनाथजी, बीना राय, निम्मी ही सर्व मंडळी नेहमी मला नाच (नृत्य) करायला सांगत असत. ते माझ्या नाचण्यावर (नृत्यावर) खूपच खूश असायचे. त्यावेळेला आमच्या शाळेचा ५०वा वाढदिवस साजरा करण्याचं ठरलं. आमच्या टीचरनी सांगितलं की प्रमुख पाहुणे आपण प्रेमनाथजी यांना निमंत्रित करू या. माझी आई जेव्हा त्यांना आमंत्रण द्यावयास गेली तेव्हा त्यांनी पहिला प्रश्न असा विचारला की त्यावेळेला आशा नृत्य करणार आहे का? ती जर नृत्य करणार असेल तरच मी प्रमुख पाहुणा म्हणून तिथे उपस्थित राहीन. आईने त्यांना सांगितलं की आशाला म्हणावं तितकं चांगलं नाचता येत नाही. तेव्हा प्रेमनाथजी व माझ्या शाळेच्या टीचर यांच्या आग्रहावरून मी स्वर्गीय मोहनलाल पांडे यांच्याकडे १० दिवस नृत्याचे धडे घेतले. त्यात मी क्लासिकल, कथ्थक आणि भरतनाट्यमचं पूजानृत्य शिकले. हाच माझा पहिला अनुभव होता. ज्यात मी स्टेजवर हजारो लोकांसमोर काहीतरी करू शकले होते. त्यावेळेला मी फक्त आठ वर्षांची होते.

कॅमेऱ्याशी पहिला सामनाः पहिल्यांदाच मी कॅमेऱ्यासमोर आले. ती *आसमान* या चित्रपटात बालकलाकार म्हणून. शूटिंगचा तो पहिला दिवस म्हणजे अगदी आठवणीत राहण्यासारखाच होता. त्या दिवशी मला एक नृत्य सादर करायचं होतं. चित्रीकरण पूर्ण होता-होता रात्रीचे १२-१ वाजले. सकाळी शाळा लवकर असल्यामुळे मला रात्री नऊ, ते दहाच्या दरम्यान झोपायची सवय होती. रात्रीचे बारा वाजत आले आणि माझे डोळे मात्र मिटायला लागले, मी तिथेच गुडूप झाले. माझा शॉट आला तसं मला उठवण्यात आलं. परंतु माझे डोळे मात्र अर्धे बंद व अर्धे उघडे होते, मी पूर्णपणे जागी होऊ शकले नाही. सिनेमाचे दिग्दर्शक सुरेश भट्ट हे विचारात पडले की आता काय करायचे? त्यांनी लगेच निर्णय घेतला की, ते गाणे विनोदी स्वरूपात चित्रित करायचे. त्या गाण्यात मी मध्येच डोळे उघडायची व मध्येच डोळे बंद करायची, बघणाऱ्यांना असं वाटत होतं की हे गाणं मुद्दामच असं चित्रित केलेलं आहे.

त्यामागचं खरं कारण आम्हालाच माहीत होतं.

पहिले बक्षीसः तुम्हाला आश्चर्य वाटेल, परंतु मला पहिलं बक्षीस नृत्य किंवा अभिनयात न मिळता ते मला पेंटिंगमध्ये मिळालं आहे. मला लहानपणी चित्रं काढण्याची खूप आवड होती. मी खूप चित्रं काढायची. चित्र काढण्याच्या या आवडीमुळे मी एक पेंटिंगच्या स्पर्धेत भाग घेतला आणि त्यात मी हत्तीची अंबारी काढली होती. मला एवढं आठवतंय की ती एक युनिसेफची स्पर्धा होती आणि मला त्या स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालं होतं.

पहिलं आकर्षणः हॉलीवूड स्टार रॉक हडसन याच्याबद्दल मला सर्वात पहिलं आकर्षण वाटू लागलं. तो मला खूप आवडायचा. त्या काळात त्याचे चित्रपटही खूप यायचे, त्याचा एकही चित्रपट मी पाहिल्याशिवाय सोडत नव्हते. त्याची मोठ-मोठी चित्रेही माझ्याजवळ होती. मी नेहमी त्याला भेटण्याची स्वप्ने पाहायची आणि मग मी विचार करायची एकदा आपल्याला रॉक हडसनला भेटता येईल का? जर तसं झालं तर खूपच मजा येईल, परंतु माझं हे स्वप्न एक स्वप्नच राहिलं. त्यानंतर मी असं ऐकलं की त्याला एड्स झाला होता आणि त्यातच त्याला मृत्यू झाला.


पहिली स्क्रीन टेस्टः माझी पहिली स्क्रीन टेस्ट *दिल देके देखो*साठी झाली होती. त्याआधीही मी कॅमेऱ्यासमोर येऊन गेले होते. पण त्या दिवशीची भीती काही वगळीच होती. म्हणून माझी पहिलीच वेळ होती आणि सर्व काही या स्क्रीन टेस्टवर अवलंबून होतं. सेटवर गेल्यावर साधनाही येणार असल्याचं कळलं परंतु ती न आल्याने अखेर माझी निवड झाली.

पहिला नायक(हीरो): माझे पहिले नायक (हीरो) शम्मी कपूर होते. शम्मी कपूरने त्यावेळेपर्यंत खूप चित्रपट केले होते. परंतु सेटवर त्यांनी मला कधी मी नवी कलाकार आहे याची जाणीव होऊ दिली नाही. त्यांच्याबरोबर सेटवर खूप मजा यायची. सेटवर काहीना-काहीतरी नवी शिकवणं ही त्यांची खुबी होती. ते मला खूप सांभाळून घ्यायचे. इथे जाऊ नको, तिथे जाऊ नको, इतर कोणाशीही जास्त बोलू नको, याबाबतीत ते माझी खूपच काळजी घ्यायचे, एक प्रकारे ते माझे संरक्षण करायचे. यामागे त्यांचा एकच उद्देश होता की मी नवी होते व वय लहान असल्यामुळे कुठे मला वाईट अनुभव यायला नको. सेटवर आमची खूपच मस्ती चालायची. नेहमी आम्ही इतर मुलींना कॅमेरा त्यांच्या भोवती फिरवून सतावत असू. त्यांची स्वर्गीय पत्नी गीताबाली यासुद्धा सेटवर येत असत. त्या आल्या की माझे केस बांधत असत, माझा मेकअपही करत असत. ते दिवस खरोखरच आनंदाचे आणि मजेदार होते.

पहिले दिग्दर्शकः माझे पहिले दिग्दर्शक सुरेश भट्ट होते. परंतु त्यावेळेपर्यंत मला दिग्दर्शनसारख्या गोष्टींची समज आली नव्हती. पहिले दिग्दर्शक नासिर हुसेन होते. त्या दिवसात नासिर हुसेन यांनी आपण चांगले संगीत सिनेमा करणारे दिग्दर्शक आहोत हे सिद्ध केलं होतं. माझ्या पहिल्या सिनेमात मी त्यांच्याकडून खूप काही शिकले. ते एक-एक गोष्ट शूट करायचे आणि नंतर ते कसं केलं, काय केलं हे सांगायचे. नासिर हुसेन यांच्याबरोबर मी खूप चित्रपट केले. नासिर हुसेन एक पुस्तक तिथे ठेवत असत त्यात शॉर्ट डिविजन सर्व दृश्यांची संपूर्ण माहिती असे. मला जेव्हा लवकर जायचं असायचं तेव्हा मी त्या पुस्तकात माझे शॉट केव्हा आहेत ते पाहून ठेवत असे. एक मजेदार गोष्ट मी तुम्हाला सांगते. आम्ही 'आँखों से जो उतरी है दिल में...' या गाण्याचं आऊटडोअर करत होतो तेव्हा आम्हाला कळलं की आमच्याजवळ एक हजार फुटाची रीळ शिल्लक राहिलेली आहे, त्या एक हजार फुटाच्या रीळमध्ये आम्हाला गाणं करायचं होतं. नासिर हुसेन यांनी मला बोलावून सांगितलं की रीळ नेमकी असल्यामुळे रिटेक होणार नाही. चांगलं दृश्य चित्रित करण्याअगोदर त्यांनी त्या गाण्याच्या खूप रिहर्सल केल्या; कारण नंतर कुठला त्रास होऊ नये. जेव्हा शॉट चित्रित करण्याची वेळ आली तेव्हा मात्र मी खूपच घाबरून गेले. देवाचं नाव घेऊन मी शॉटसाठी कशीबशी तयार झाले. त्या नेमक्या रीळमध्ये आम्ही ते गाणं करून दाखवलं.

पहिली प्रदर्शित नायिकाः पहिला प्रदर्शित *दिल देके देखो*ची नायिका म्हणून प्रथम पडद्यावर आले. तो दिवस आजही आठवतो. कारण सकाळपासून मी खूप घाबरून गेले होते. खूपच नर्व्हस होते. कारण बऱ्याच जणांनी मला नायिका म्हणून नाकारलं होतं. मनात शंका आली की दर्शकांनीही मला नाकारलं तर? त्या दिवशी माझ्या खोलीत मी दरवाजा बंद करून बसले होते. पण माझी भीती खोटी ठरली. कारण पहिल्या प्रदर्शित झालेल्या चित्रपटाने मी स्टार झाले. माझा आनंद गगनात मावेनासा झाला.

पहिला फिल्मफेअर ॲवॉर्डः त्याकाळात फिल्मफेअर ॲवॉर्डचं महत्त्व काही वेगळंच असायचं. मला पहिला फिल्मफेअर ॲवॉर्ड *कटी पतंग* चित्रपटासाठी मिळाला होता. माझ्याबरोबर तेव्हा मुमताज आणि शर्मिला टागोर यांचेही नाव होते. *कटी पतंग*साठी मी खूपच मेहनत केली होती. तो रोलही खूपच छान होता आणि एक नवीनच विषय होता. त्यातली गाणीही फारच चांगली होती. मला त्या चित्रपटासाठी ॲवॉर्ड मिळेल याची कल्पना नसताना अचानक माझं नाव घेतलं गेल्यामुळे मला एकदम आश्चर्य वाटलं. मला खूपच आनंद झाला. फिल्मफेअर ॲवॉर्ड मला श्याम बेनेगल यांच्या हस्ते मिळणार होता. माझ्या दृष्टीने ती फार गर्वाची गोष्ट होती.



नायिका म्हणून शेवटचा चित्रपट *मै तुलसी तेरे आंगन की*मध्ये नूतनबरोबर



*कोरा कागज*च्या सेटवर अभिनेता सलिल अंकोलासह निर्माती आशा पारेख

पहिलं घरः सांताक्रुजमध्ये आमचं छोटंसं घर होतं. बरीच वर्षं माझी स्वतःची एक इच्छा होती, ती म्हणजे आपलं स्वतःचं एक छानसं घर असावं. माझ्या स्वतःच्या घराचं स्वप्न १९६४ साली सुधाच्या रूपात पूर्ण झालं. सिमेंट काँक्रिट आणि लाल दगड यापासून बंगला तयार झाला. त्याचे आर्किटेक्चर स्व. जरी गांधी होते. वेगळ्याप्रकारे बांधलेल्या बंगल्यावर खूपच चर्चा झाली, परंतु ज्यांना त्याबद्दल खरं ज्ञान होतं त्यांनी त्याचं खूप कौतुक केलं. बंगल्यावर माझे खूपच प्रेम आहे. कारण तिथे माझ्या खूप आठवणी जोडलेल्या आहेत. तेव्हा माझे *आये दिन बहार के, तिसरी मंजिल, आया सावन झूम के* हे चित्रपट प्रदर्शित झाले होते.

पहिली गाडीः आमच्या घरात मी लहान होते तेव्हापासूनच गाडी होती, कारण बाबांचा व्यवसाय होता, त्यामुळे त्यांना गाडीची जास्त आवश्यकता होती. परंतु मला माझ्या स्वतःच्या कमाईची गाडी हवी होती. म्हणून मी ऑस्टिन खरेदी केली, मी स्वतःच गाडी चालवायची. ड्रायव्हिंग करायला मला खूप आवडायचं. परंतु परमेश्वराच्या कृपेमुळे माझ्याकडून अपघात मात्र झाला नाही.

पहिला फ्लॉपः स्टार झाल्यानंतर माझे काही चित्रपट चांगले चालले नाहीत. माझा *चिराग* चित्रपट फ्लॉप झाल्यामुळे खूप दुःख झालं होतं. राज खोसला यांच्या या चित्रपटात सुनील दत्त माझे नायक होते तर ओमप्रकाश यांनी माझ्या मोठ्या भावाचं काम केलं होतं. त्यात मी एका आंधळ्या मुलीची भूमिका केली होती. चित्रपट फ्लॉप झाला, परंतु त्यातील 'तेरी आँखों के सिवा दुनिया में रखा क्या है...' हे गाणे मात्र खूप लोकप्रिय झालं होतं.

चरित्र नायिका म्हणून पहिला चित्रपटः नायिका म्हणून गाजलेला माझा शेवटचा चित्रपट *मैं तुलसी तेरे आंगन की* खूपच हिट ठरला. त्यानंतर पहिल्यांदाच *कलीया* चित्रपटात वहिनीची भूमिका केली. अगदी सहजपणेच मी या भूमिका स्वीकारल्या. परंतु काही चित्रपटानंतर अशाप्रकारच्या चरित्र भूमिकांमुळे मी *किनारा* करण्याचं ठरवलं. माझ्या संपूर्ण करिअरच्या दृष्टीने चरित्र भूमिका करणं धोकादायकही नव्हतं.

पहिली निर्मितीः चरित्र भूमिकांना तिलांजली दिल्यानंतर बरेच दिवस आराम केल्यानंतर निर्मितीच्या मागे लागले. माझ्या मित्रांनी छोट्या पडद्यावरही काही कर असं सांगितलं. निर्मातीच्या रूपात माझी पहिली गुजराती धारावाहिक *ज्योती* होती. तेव्हा मी खूपच नर्व्हस होती की मी चुकीचा मार्ग तर स्वीकारला नाही ना. *ज्योती* हिट ठरल्यानंतर मात्र माझा उत्साह खूपच वाढला, त्यानंतर मुंबई दूरदर्शनसाठी *पलाश के फूल* धारावाहिक तयार केली. झी वाल्यांकडेही बऱ्याच वेळा गेले. परंतु काही फायदा झाला नाही. आमच्याजवळ काहीच नव्हतं. नृत्याची माहिती पहिल्यापासून असल्यामुळे मी *बाजे पायल* तयार केली.



सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदाची यशस्वी कारकीर्द



स्टार प्लसवरील दुसरी मालिका *कंगन*मधील एक दृश्य

पहिलं दिग्दर्शनः मी स्टार टीव्हीवाल्यांची खूपच आभारी आहे. कारण *दाल में काला* धारावाहिकेमुळे मी निर्माती झाली. परंतु मला दिग्दर्शनात काहीतरी करावं असं वाटू लागलं. *कोरा कागज*च्या रूपाने ही इच्छा पूर्ण झाली. त्यात रेणुका शहाणे, शम्मी आंटी हे मित्र होते, त्याचे दुसरे कलाकार सलिल अंकोला, उत्तरा बावकर, एस. एम. जहीर यांच्या संयोगामुळे *कोरा कागज* प्रसारित झाली. त्याआधी आम्ही दोन मालिका केल्या.

दिग्दर्शनाचा पहिला दिवसः *कोरा कागज* प्रसारित होऊन आज तीन वर्षं झाली. दिग्दर्शिकेच्या रूपातील पहिला दिवस आजही माझ्या आठवणीत आहे. कारण मी कुठल्याही गोष्टीचे दडपण लगेच घेते. एकतर नवीन कॅमेरामन, साऊंड रेकॉर्डिंग करणारा नवीन. परंतु सर्वकाही व्यवस्थित झालं आणि *कोरा कागज* लोकांना खूपच आवडली. त्यानंतर *कंगन* मालिकेची निर्मिती केली.

दिग्दर्शनातील माझे पहिले गुरुः मी अभिनय करत होते तेव्हा मला भविष्यात दिग्दर्शिका होईन याची अजिवात कल्पना नव्हती. परंतु एक गोष्ट मात्र नक्की की, दिग्दर्शनाची मला आवड होती. नेहमी मी जाणण्याचा प्रयत्न करायची की दिग्दर्शक कुठल्या गोष्टीचा विचार करतोय? बालकलाकार म्हणून मी एस. व्ही. रामन यांच्याबरोबर काम करायचे तेव्हा मला वाटायचं ते शॉट कसे घेत असतील? काय करत असतील? असे प्रश्न सतत मला भेडसावीत असत. एस. मुखर्जी हे मला फावल्या वेळात फिल्मालया स्टुडियोमध्ये दिग्दर्शनाच्या बेसिकबद्दल सांगत असत. नासिर हुसेन यांनीही खूप काही शिकवलं होतं. राज खोसला यांच्याबरोबर मी *चिराग, मेरा गांव मेरा देश, दो बदन, मैं तुलसी तेरे आँगन की* सारखे चित्रपट केले. गुरुदत्तबरोबर मला *भरोसा*मध्ये काम करण्याचं भाग्य लाभलं. *भरोसा* दिग्दर्शक आजारी होते तेव्हा गुरुदत्तनी दिग्दर्शन केलं, तेव्हा ते सांगायचे की दिग्दर्शक झाल्यावर कसे शॉट करायचे वगैरे. विजय आनंद, नूतन व एस. एल. वासक यांच्याकडूनही मला खूप काही शिकायला मिळालं.

सेन्सॉर बोर्डच्या चेअरपर्सनचा पहिला अनुभवः सेन्सॉर बोर्डची चेअर पर्सन होण्याचे भाग्य मला पहिल्यांदा सुषमाजी (स्वराज) यांनी दिले. माझ्याव्यतिरिक्त शबाना, हेमामालिनी आणि काहींची नावं होती. त्यांनी नकार दिल्यानंतर पहलाज निहलानी यांच्या सांगण्यावरून मी हे पद स्वीकारलं. जबाबदारी स्वीकारल्यावर सुरुवातीला मी थोडी घाबरून गेले. हे काम मी व्यवस्थितपणे पार पाडेल ना? माझं नशीब चांगलं असल्यामुळे सर्व सहकाऱ्यांच्या मदतीमुळे इथेही मी यश प्राप्त केलं. सुषमा स्वराज, प्रमोद महाजन व अरुण जेटली यांनी तर खूपच मदत केली. खरं तर या दरम्यान काही निर्माता-दिग्दर्शकांची नाराजीही मी ओढवून घेतली. पण त्याला इलाज नव्हता. तो माझ्या कामाचा एक भाग होता. आणि काम मग ते अभिनयाचं असो, निर्मितीचं, दिग्दर्शनाचं नाहीतर सेन्सॉर बोर्डाचं मी प्रामाणिकपणे केलं. तिथे व्यक्तिगत हितसंबंधांचा फार विचार केला नाही. ●